नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ३ रे<br>Year - 3rd | अंक - १७९<br>Issue - 179 | वार मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५<br>Blow- Tuesday Date 18 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# धावत्या बसला डिझेल टँकरची धडक, एकाच कुटुंबातील १८ जणांचा करुण अंत

## तीन पिढ्यांमधलं एकही वाचलं नाही; नऊ वृद्ध आणि नऊ मुलं ठार : ४२ भारतीयांचा होरपळून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रियाद : सौदी अरेबियातील मदीनाजवळ झालेल्या रस्ते अपघा-तात मृत्युमुखी पडलेल्या ४२ भारतीय यात्रेकरूंमध्ये ९ मुलांसह एकाच कुटुंबातील १८ सदस्यांचा समावेश आहे. हैदराबाद येथील हे कुटुंब शनिवारी संध्याकाळी परतणार होतं, पण त्याआधीच कुटुंबातील सदस्य आसिफने सांगितलं की, 'माझी वहिनी, दीर, त्यांचा मुलगा, तीन मुली आणि त्यांची मुले उमराहसाठी गेले होते. ते आठ दिवसांपूर्वीच गेले होते. उमराह पूर्ण झाला होता आणि ते मदीनाला परतत होते. हा अपघात पहाटे १.३० वाजेच्या सुमारास झाला आणि बस आगीत जळून खाक झाली. जवळपास ५० जणांपैकी ४२ जण भारतीय नागरिक होते. ४२ नागरिक मृत्यूमुखी पडल्याचे वृत्त आहे.

या दुर्घटनेपूर्वी तो त्याच्या नातेवाईकांशी सतत संपर्कात होता, असंही आसिफने सांगितलं. 'एकाच कुटुंबातील १८ सदस्य, ९ वृद्ध आणि ९ मुलं, मृत्युमुखी पडले आहेत. ही आमच्यासाठी एक भयानक शोकांतिका आहे,' असं तो म्हणाला.

असिफने त्याच्या काही नातेवाईकांची ओळख पटवली, ज्यात नसिरुद्दीन (वय ७०), त्याची पत्नी अख्तर बेगम (वय ६२), मुलगा सलाहुद्दीन (वय ४२), मुली अमिना (वय ४४), रिझवाना (वय ३८) आणि शबाना (वय ४०) आणि त्यांची मुले यांचा समावेश आहे. कोणीतरी शेजाऱ्याकडून नसिरुद्दीन आणि त्याच्या कुटुंबाच्या रामनगर येथील घराच्या चाव्या आणल्या आणि त्याची बहीण तिच्या भावाच्या





घरात शिरताच मोठ्याने रडण्याचा आवाजा येऊ लागला.

या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ४२ जणांपैकी बहुतेक जण हैदराबादचे होते. मिळालेल्या माहितीनुसार, ते ज्या बसमधून प्रवास करत होते ती मदिनापासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर एका डिझेल टँकरशी धडकली. रात्री उशिरा बहुतेक प्रवासी झोपेत असताना हा अपघात झाला. त्यामुळे अपघातानंतर गाडीला आग लागल्याने त्यांना वेळेत बाहेर पडता आले नाही आणि त्यांचा तिथेच होरपळून मृत्यू झाला. या भीषण अपघातात एकाच कुटंबातील तब्बल १८ जणांचा मृत्यू झाला, म्हणजे एकाचवेळी ती पिढ्या उद्धवस्त झाल्या आहेत. हे सर्व हैदराबादमधील रहिवासी होते.

'रियाध येथील दूतावास आणि जेद्दाह कॉन्सुलेट प्रभावित लोकांना सर्वतोपरी मदत करत आहे', असं त्यांनी म्हटलं आहे. तसेच तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंथ रेड्डी यांनी सौदी अरेबियात मक्काहून मदिनाकडे जाणाऱ्या यात्रेकरूंच्या बस अपघाताच्या बातमीवर तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मुख्यमंत्री कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार अपघातात हैदराबादमधील काही नागरिकही सामील असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर, रेवंत रेड्डी यांनी मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांना संपूर्ण माहिती गोळा करण्याचे निर्देश दिले आहेत.

# टॅरिफ बहाद्दर डोनाल्ड ट्रम्प सपशेल बॅकफूटवर!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिकेने कॉफी, चहा, मसाले, उष्णकटिबंधीय फळे आणि फळांचे रस यासारख्या भारतीय उत्पादनांवरील ५० टक्के परस्पर कर रद्द केला आहे. यामुळे सुमारे १ अब्ज डॉलर्स (अंदाजे ₹९,००० कोटी) किमतीच्या कृषी निर्यातीला मोठा दिल-ासा मिळेल. व्हाईट हाऊसच्या कार्यकारी आदेशाद्वारे ही सूट १२ नोव्हेंबर रोजी जारी करण्यात आली आणि १३ नोव्हेंबरपासून लागू झाली. अमेरिकेने रशियन तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर ५० टक्के कर लाद-ला होता. अमेरिकेत अन्नपदार्थांच्या सतत वाढत्या किमतींमुळे ट्रम्प प्रशासन बॅकफूटवर होते. २०२५च्या आर्थिक वर्षात भारताची अमेरिकेला होणारी कृषी निर्यात २.५ अब्ज डॉलर्स (₹२२,००० कोटी) किमतीची होती, त्यापैकी ₹९,००० कोटी किमतीची निर्यात आता करमुक्त झाली आहे. वाणिज्य मंत्रालयाने १७ नोव्हेंबर रोजी याची घोषणा

### भारतातील चहा, कॉफी आणि मसाल्यांवरील ५० टक्के कर रद्द

केली. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने सांगितले की यामुळे भारतीय निर्यातदारांना समान संधी मिळेल.

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार आता अंतिम टप्प्यात आहे. भारताचे वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, भारतीय बाजारपेठेत प्रवेश मिळावा यासाठी अमेरिकेची मागणी, २५ टक्के परस्पर शुल्क आणि कच्च्या तेल-ावर अतिरिक्त २५ टक्के शुल्क यासारख्या मुद्द्यांवर करार जवळजवळ झाला आहे. त्यांनी सांगितले की ते लवकरच ते अंतिम करतील. दोन्ही देशांमधील व्यापार करारावर या वर्षी फ ेब्रुवारीपासून वाटाघाटी सुरू आहेत.

अमेरिकेने ज्या उत्पादनांचे उत्पादन कमी आहे त्या उत्पादनांवरील शुल्क हटवले आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या मते, मसाल्यांचे निर्यात म ूल्य ३५८.६६ दशलक्ष (अंदाजे ₹३,२०० कोटी) आहे, जे आता करमुक्त आहे. त्याचप्रमाणे, ४९१.३१ दशलक्ष (अंदाजे ₹४,३४५ कोटी) किमतीच्या ५० प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या निर्यातीला आणि ८२.५४ दशलक्ष (अंदाजे ₹७३१ कोटी) किमतीच्या चहा आणि कॉफीला दिलासा मिळाला आहे. ५४.५८ दशलक्ष डॉलर्स (₹४८४ कोटी) किमतीच्या ४८ फळे आणि काजू उत्पादनांवर, काही आवश्यक तेले, २६ भाज्या आणि खाद्यतेल मुळे तसेच काही गोम ांस आणि गोवंशीय उत्पादनांवर कर सवलत देण्यात आली. ही सर्व उत्पादने उष्णकटिबंधीय हवामानातून येतात, म्हणून अमेरिकेने त्यांना सूट दिली.

सरकारी अंदाजानुसार, भारताच्या ४८.२ अब्ज डॉलर्स (अंदाजे ₹४.३ लाख कोटी) किमतीच्या निर्यातीवर उच्च कर आकारण्यात आला. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये एकूण ८६.५१ अब्ज डॉलर्स (अंदाजे ₹७.६६ लाख कोटी) किमतीच्या वस्तू अमेरिकेला पाठवण्यात आल्या, ज्यामध्ये कापड, दागिने आणि अभियांत्रिकी वस्तू यासारख्या शीर्ष पाच श्रेणींमध्ये ६० अब्ज (अंदाजे ₹५.३ लाख कोटी) किमतीच्या वस्तूंचा समावेश आहे.

# ...अन्यथा निवडणुकाच रोखू...सुप्रीम कोर्टाचा महाराष्ट्र सरकारला गंभीर इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका, नाहीतर निवडणुकाच रोखू, असा गंभीर इशारा सुप्रीम कोर्टाने दिला आहे. आरक्षण मर्यादा ओलांडली जात असल्याच्या याचिकेवर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने संताप व्यक्त केला. या याचिकेवर बुधवारी पुन्हा सुनावणी होणार असल्याने राज्यातील पालिका निवडणुकांवर टांगती तल-वार आली आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत ओबीसी प्रवर्गासाठी सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यामुळे अनेक पालिकांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली जात असल्याकडे सुप्रीम कोर्टाचं याचिकेद्वारे लक्ष वेधण्यात आलं. ओबीसी आरक्षणाबाबत विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमला बागची यांच्या खंडपीठापुढे काल सुनावणी झाली. तेव्हा आपल्या आदेशाचा चुकीचा आणि सोयीचा अर्थ काढून ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण लागू करण्याच्या राज्य सरकारच्या कृतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशप्रमाणे बांठिया आयोगाच्या पूर्वीच्या परिस्थितीत म्हणजेच ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणूक व्हायला पाहिजे आणि ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली जाते आहे, असा दावा करणाऱ्या राज्य सरकारविरोधातील अवमान याचिकेवर काल (१७ नोव्हेंबर) सुनावणी झाली.

मिनी विधानसभा निवडणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी उमेदव-ारी अर्ज भरण्याची मुदत काल संपली. आजपासून अर्जांची छाननी होणार आहे. अर्ज छाननी नंतर वैध उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार असून १९ ते २१ नोव्हेंबर या दरम्यान उमेदवारांना अर्ज म ागे घेता येतील. तर २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची चिन्हांसह अंतिम यादी जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी येत्या २ डिसेंबरला मतदान होणार आहे तर ३ डिसेंबरला निकाल लागणार आहे.

### राज्य सरकारचा मोठा निर्णय

# लाडक्या बहिणींसाठी ई केवायसीची मुदत डिसेंबरपर्यंत वाढवली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील महिलांची ई-केवायसी प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. या दरम्यान अलिकडे काही जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती, म हिलांनी उपस्थित केलेल्या अडचणी लक्षात घेता, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचना आणि म ार्गदर्शनाखाली ई-केवायसी करण्याची मुदत आता वाढवण्यात आली होती. याआधी ही मुदत १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत निर्धारित अंतिम मुदत होती. पण निर्धारित मुदत आता वाढवण्यात आली आहे. आता महिला आपली ई-केवायसी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत करु शकणार आहेत. कारण आता राज्य सरकारने ई-केवायसीची मुदतवाढ ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत करण्याचा निर्णय शास-नाने घेतल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

ई-केवायसी करताना महिलांच्या आधारकार्डशी लिंक असणाऱ्या मोबाईल नंबरवर ओटीपी येतो. त्यानंतर महिलेच्या वडिलांच्या किंवा पतीच्या आधारकार्डवर लिंक असेलल्या नंबरवर दुसरा ओटीपी येतो. त्यानंतरच ही ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण होत आहे. यामुळे महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.



अनेक महिलांच्या वडील किंवा पतीच्या म ोबाईलनंबरवर ओटीपी येत नसल्याची तक्रार येत होती. यावरही राज्य सरकारने उपाय शोधला आहे. तसेच अशाप्रकारच्या अनेक समस्यांसाठीच ई-केवायसीसाठीची मुदत वाढवण्यात आल्याचं मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. कोणत्याही लाभार्थी महिलेला याचा फटका बसू नये हा यामागचा प्रामाणिक हेतू सरकारचा आहे.

अलीकडील नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक कुटुंबांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच काही महिलांच्या पती किंवा वडिलांचे निधन झाल्यामुळे संबंधित आध-ार क्रमांकावर ओटीपी प्राप्त होणे अशक्य झाले आहे. अशा परिस्थितीत अपूर्ण ई-केवायसी प्रक्रियेस मुदतवाढ देणे आवश्यक आहे. तसेच, ज्या पात्र महिलांच्या पती किंवा वडील हयात नाहीत किंवा ज्या म हिला घटस्फोटित आहेत अशांनी स्वतःची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मृत्यू प्रमाणपत्र, घटस्फोट प्रमाणपत्र किंवा माननीय न्यायालयाचा आदेश यांची सत्यप्रत सादर करणे आवश्यक राहील, असं महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे.

या अनुषंगाने पात्र महिलांना न्याय मिळावा आणि कोणतीही पात्र महिला तांत्रिक किंवा अपरिहार्य कारणांमुळे योजनेपासून वंचित राहू नये, ही शासनाची भूमिका आहे. याकरिता माननीय मुख्यमंत्री आणि दोन्ही माननीय उपमुख्यमंत्री यांच्या म ार्गदर्शनाखाली महिलांच्या हिताचे भान राखत ई-केवायसी प्रक्रियेस ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच विस्तारित कालावधीत लाभार्थींनी आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आ-वाहनही मंत्री तटकरे यांनी केले आहे.


## जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### ट्रम्प बॅकफूटवर

अमेरिकेने कॉफी, चहा, मसाले, उष्णकटिबंधीय फळे आणि फळांचे रस यासारख्या भारतीय उत्पादनांवरील ५० टक्के परस्पर कर रद्द केला आहे. यामुळे सुमारे १ अब्ज डॉलर्स (अंदाजे ₹९,००० कोटी) किमतीच्या कृषी निर्यातीला मोठा दिलासा मिळेल. व्हाईट हाऊसच्या कार्यकारी आदेशाद्वारे ही सूट १२ नोव्हेंबर रोजी जारी करण्यात आली आणि १३ नोव्हेंबरपासून लागू झाली. अमेरिकेने रशियन तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर ५० टक्के कर लादला होता. अमेरिकेत अन्नपदार्थांच्या सतत वाढत्या किमतींमुळे ट्रम्प प्रशासन बॅकफूटवर होते. २०२५च्या आर्थिक वर्षात भारताची अमेरिकेला होणारी कृषी निर्यात २.५ अब्ज डॉलर्स (₹२२,००० कोटी) किमतीची होती, त्यापैकी ₹९,००० कोटी किमतीची निर्यात आता करमुक्त झाली आहे. वाणिज्य मंत्रालयाने १७ नोव्हेंबर रोजी याची घोषणा केली. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने सांगितले की यामुळे भारतीय निर्यातदारांना समान संधी मिळेल. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार आता अंतिम टप्प्यात आहे. भारताचे वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, भारतीय बाजारपेठेत प्रवेश मिळावा यासाठी अमेरिकेची मागणी, २५ टक्के परस्पर शुल्क आणि कच्च्या तेलावर अतिरिक्त २५ टक्के शुल्क यासारख्या मुद्द्यांवर करार जवळजवळ झाला आहे. त्यांनी सांगितले की ते लवकरच ते अंतिम करतील. दोन्ही देशांमधील व्यापार करारावर या वर्षी फेब्रुवारीपासून वाटाघाटी सुरू आहेत. अमेरिकेने ज्या उत्पादनांचे उत्पादन कमी आहे त्या उत्पादनांवरील शुल्क हटवले आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या मते, मसाल्यांचे निर्यात मूल्य ३५८.६६ दशलक्ष (अंदाजे ₹३,२०० कोटी) आहे, जे आता करमुक्त आहे. त्याचप्रमाणे, ४९१.३१ दशलक्ष (अंदाजे ₹४,३४५ कोटी) किमतीच्या ५० प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या निर्यातीला आणि ८२.५४ दशलक्ष (अंदाजे ₹७३१ कोटी) किमतीच्या चहा आणि कॉफीला दिलासा मिळाला आहे. ५४.५८ दशलक्ष डॉलर्स (₹४८४ कोटी) किमतीच्या ४८ फळे आणि काजू उत्पादनांवर, काही आवश्यक तेले, २६ भाज्या आणि खाद्यतेल मुळे तसेच काही गोमांस आणि गोवंशीय उत्पादनांवर कर सवलत देण्यात आली. ही सर्व उत्पादने उष्णकटिबंधीय हवामानातून येतात, म्हणून अमेरिकेने त्यांना सूट दिली. सरकारी अंदाजानुसार, भारताच्या ४८.२ अब्ज डॉलर्स (अंदाजे ₹४.३ लाख कोटी) किमतीच्या निर्यातीवर उच्च कर आकारण्यात आला.

# बालपणाच्या सुरक्षिततेची सामाजिक जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१८ नोव्हेंबर हा दिवस 'बाल लैंगिक शोषण, गैरवर्तन आणि हिंसाचार प्रतिबंध आणि उपचारांसाठी जागतिक दिन' (World Day for the Prevention of and Healing from Child Sexual Exploitation, buse, and Violence) म्हणून जगभर साजरा केला जातो, आणि हा दिवस केवळ स्मरणाचा नाही, तर समाजाला मुलांच्या संरक्षणाची आणि पुनर्संचयाच्या जबाबदारीची पुन्हा एकदा जाणीव करून देणारा आहे. याच पार्श्वभूमीवर, नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या (NCRB) Crime in India - 2023 अहवालातील आकडेवारी मुलसंरक्षणाच्या दृष्टिकोनातून धक्कादायक कार्यप्रकरणे उघड करते. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार २०२३ मध्ये देशभरात १७७३३५ मुलांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत, जो आकडा २०२२ च्या तुलनेत ९.२% ने अधिक आहे. मुलसंख्येनुसार, हा गुन्हे दर प्रति १००००० मुलांमध्ये ३९.९ इतका आहे, जो २०२२ मधील ३६.६ पेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालात दोन गुन्हेगारी प्रकार विशेषत: चिंताजनक आहेत. एक म्हणजे Kidnapping and bduction of Children यात ७९८८४ प्रकरणे नोंदली गेली आहेत, म्हणजे अंदाजे ४५% सर्व बाल गुन्ह्यांचा भाग. दुसरा मोठा प्रकार आहे Protection of Children from Sexual Offences (POCSO) लीं अंतर्गत गुन्हे या श्रेणीत ६७६९४ प्रकरणे आहेत, जी एकूण गुन्ह्यांच्या सुमारे ३८.२% आहेत. हे आकडेगणित दाखवतात की मुलांना फक्त भौतिक हरवण्याचा धोका नाही, तर त्यांच्या लैंगिक सुरक्षिततेवरदेखील खोल धोक्यांची घंटा आहे.

POCSO अंतर्गत, अहवालात penetrative sexual assault प्रकारात ४०४३४ प्रकरणे आहेत, आणि यात ४०८४६ पीडित मुलांचा समावेश आहे. या प्रकारातील अपराधी ३९०७६ प्रकरणांमध्ये मुलांसाठी परिचित व्यक्ती होते म्हणजे कुटुंबातील सदस्य, शेजारी, नातेवाईक किंवा ऑनलाईन मित्र. हा विश्वासाचा दुरुपयोग आपल्या पारंपारिक सामाजिक संरचनांमध्ये किती खोलवर आहे हे उघड दाखवतो; जिथे मुलांचा संरक्षक असावा अशी अपेक्षा आहे, तेथेच शोषणाची शक्यता वाढते.

त्याचबरोबर अहवालात aggravated assaults and harassment POCSO च्या सेक्शन ८ व १० व खझ्झउ च्या सेक्शन ३५४ अंतर्गत २२४४४ प्रकरणे नोंदवली गेली आहेत. हे प्रकार धमकावणे, सतत त्रास देणे, आत्म-सन्मान खालावणे या भावनिक आणि मानसिक हिंसेचे स्वरूप दर्शवतात, ज्या मुलांच्या मनावर खोल आणि दीर्घकालीन परिणाम करतात. या प्रकारांच्या माध्यमातून समाजाने मुलांच्या हक्कांचे पुनर्विचार करायला हवा केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर संवेदनशीलता, विश्वास पुनर्स्थिती आणि पुनर्बांधणी देखील अत्यावश्यक आहे.

पीडित मुलांचे वयविभाजन पाहताना, अहवालात असे सांगितले आहे की ७६२ मुलं सहा वर्षांखालची, ३२२९ मुलं सहा ते बारा वर्षे, १५४४४ मुलं बारा ते सोळा वर्षे, आणि २१४११ मुलं सोळावी ते अठरावी वर्षे यामध्ये आहेत. एकूण ४०८४६ पीडित. हे वयोगट विभाजन हे दाखवते की या गुन्ह्यांचा प्रभाव ज्या वयोगटांमध्ये मुलं सर्वात अधिक असुरक्षित असतात त्यांच्या जाणीवशीलतेच्या टप्प्यावर तिथेच आहे. हे लहान वयात होणारे शोषण मुलांच्या आत्मविश्वास, सामाजिक संवाद, शैक्षणिक यश व भावनिक सुरक्षिततेवर खोलवर परिणाम करू शकतात, आणि हे प्रभाव समाजात दीर्घकाल टिकू शकेल.

राज्यानिहाय डेटा देखील चिंताजनक आहे. उदा. मध्य प्रदेशमध्ये २२३९३ प्रकरणे नोंदली गेली आहेत, तर महाराष्ट्रात २२३९० प्रकरणे आहेत. या आकड्यांमध्ये सामाजिक-आर्थिक असमानता, प्रशासकीय क्षमता, लोकसंख्या घनता आणि स्थानिक सुरक्षितता यांचा खोल संदर्भ आहे. या फरकांमुळे मुलांच्या संरक्षकतेच्या धोरणांमध्ये स्थानिक स्तरावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे; एकसारखी राष्ट्रीय धोरणे पुरेशी नसतात, कारण प्रत्येक भागाची आपली वैशिष्ट्ये आणि समस्या असतात.

डिजिटल युगात मुलांसाठी धोके अधिक गुंतागुंतीचे झाले आहेत. NCRB डेटा दर्शवितो की सायबर गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे, जिथे मुलांविरुद्ध ऑनलाईन फसवणूक, ब्लॅकमेलिंग, अश्लीलता आणि शोषणाचे प्रकार नवे प्रमाण घेऊन येत आहेत. तंत्रज्ञानाने मुलांना स्वतंत्र संवाद व माहितीचा प्रवेश दिला असला, तरी समानवेळी त्यांना नव्या प्रकारच्या असुरक्षिततेशी सामोरे जावे लागत आहे. शाळा, कुटुंबे आणि स्थानिक समुदायांनी मुलांना डिजिटल साक्षरता, ऑनलाईन सुरक्षिततेची माहिती आणि तक्रार नोंदविण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर शिकविणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, हे सर्व आकडे शक्ती आणि अवलंबित्व यांच्या गुंतागुंतीवर आधारित आहेत. मुलांचा अवलंबित्व म्हणजे त्यांचा विश्वास असणारी व्यक्ती वा संस्था, पण जेव्हा अवलंबित्वाचा दुरुपयोग होतो, तेव्हा समाजातील संरचनात्मक असमानता, लिंगाधारित सत्ता, कलंक व मौन संस्कृती हे मुद्दे खोलवर उभी राहतात. मुलांना तक्रार करण्यासाठी सुरक्षित व्यासपीठ नाही किंवा त्यांनी आवाज उठावला तर लोक काय म्हणतील याची भीती असते, हे गंभीर असून हे बदलण्याचे दायित्व संपूर्ण समाजाचे आहे.

उपचाराचा स्तर म्हणजे healing हा फक्त शारीरिक पुनर्प्राप्तीपुरता मर्यादित नाही. गुन्ह्यांनंतर मुलांना त्यांच्या मानसिक वेदना, आत्मविश्वास गमावलेलेपणा, भविष्यातील भीती यांवर काम करण्याचा मार्ग द्यायला हवा. यासाठी समुपदेशन, मनो थेरपी, कुटुंब-समुपदेशन, पुनर्बांधणी केंद्रे, शैक्षणिक पाठबळ आणि सामाजिक पाठबळ या सर्वांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. समाजाने मुलांना पुनरजीवनाचा हक्क देण्याची संस्कृती विकसित करावी हे फक्त कायदेशीर कर्तव्य नसून नैतिक व मानवी दायित्व आहे.

कायद्याच्या पातळीवर, POCSO ct आणि इतर कायदे उपलब्ध असले तरी त्यांची अंमलबजावणी आणि पुनरावलोकन महत्वाचे आहे. तपास प्रक्रियेतील विलंब, पुराव्यांची कमतरता, न्यायालयीन विलंब आणि दोषींच्या शिक्षेचा अभाव हे अडथळे कायम आहेत. यासाठी विशेष बाल-मैत्रीपूर्ण तपास यंत्रणा, त्वरित प्रतिसाद गट (rapid response), समुपदेशन समर्थन आणि विशेष बाल न्यायालयांची आवश्यकता आहे.



समाजात बदल घडविण्यासाठी आवश्यक आहे व्यापक जनजागृती, सहभागी संरचना व सामदायिक संवाद. शाळांमध्ये मुलांना बॉडी ऑटोनॉमी, ना म्हणण्याचा अधिकार व गुड टच-बॅड टच यावर शिक्षण देणे महत्त्वाचे आहे; पालकांसाठी संवाद कौशल्ये व संरक्षकतेबाबत प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक आहे; स्वयंसेवी संस्था व स्थानिक गट बाल संरक्षण मोहीम राबवू शकतात. माध्यमांनी दोषारोपापेक्षा पुनर्बांधणीच्या गोष्टींवर मार्गदर्शक संवाद निर्माण करणे आवश्यक आहे.

सरकारने दीर्घकालीन धोरणात्मक गुंतवणूक वाढवावी पुनर्बांधणी केंद्रे, समुपदेशन सेवा, डिजिटल सुरक्षितता संस्थांना पाठबळ, आणि शेल्टर होम्स यांसाठी निधी देऊन मुलांच्या पुनरजीवनाची पायाभरणी करावी. ही गुंतवणूक फक्त खर्च नाही तर समाजाच्या नैतिक आणि भावनिक स्वास्थ्यात एक गुंतवणूक आहे.

१८ नोव्हेंबरचा हा दिवस फक्त स्मरणाचा दिवस नाही तर तो एक संघटित सामाजिक संकल्पाचा दिवस असावा. समाजाने प्रतिज्ञा करावी की मुलांचे संरक्षण, त्यांचे पुनरजीवन आणि त्यांच्या हक्कांची राखणी यासाठी आपण एकत्र काम करू, कारण मुलांचं बालपण सुरक्षित असेल तरच आपला समाज खऱ्या अर्थाने प्रगत आणि मानवतावादी असेल. आपण फक्त निरीक्षक न राहू, तर कर्ते बनुया; कारण मुलांचे भवितव्य त्यांच्या सुरक्षेत व संरक्षणातच दडलेले आहे.

- डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२,
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# 'ती' च्या जीवनाचा 'फैसला'..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/प्रतिनिधी दिनेश घनघाव :दिनांक १३ नोव्हेंबर रोजी प्रेम जाधव लिखित 'फैसला' हे सामाजिक वास्तवावर आधारित आचार्य अत्रे कल्याण येथे प्रेक्षकांच्या गर्दीत संपन्न झाले. सदर नाटक यंदाच्या राज्य नाट्य स्पर्धेत कल्याण केंद्रातून प्रेक्षकांच्या प्रचंड गर्दीत संपन्न झाला.नाटकाची सुरुवात सुशीला मांगे या २१ वर्षांच्या मुलीच्या खटल्याने होते. तिच्यावर स्वतःच्या वडिलांच्या खुनाचा आरोप आहे, पण कोणताही ठोस पुरावा नसतो. न्यायालय निर्णय देत नाही आणि तिचा खटला एका विशेष समितीकडे सोपवतो.

या समितीत शिक्षिका अनुपमा पाटील, कलाकार राहुल जुवेकर, सी.ए. स्नेहलता सरदेसाई, समाजसेवक मिलिंद कांबळे आणि एनजीओ चालवणारे प्रेमानंद चवरे असतात. प्रत्येकाचे विचार वेगवेगळे असतात - कोणी सुशीलाला दोषी ठरवतो, तर कोणी निर्दोष म्हणतो. चर्चेतून समाजातील वर्गभेद, अहंकार आणि पूर्वग्रह उघड होतात.

स्नेहलता आणि राहुल गरीबांना तुच्छ लेखतात, पण मिलिंद त्यांना ठाम उत्तर देतो. तो सांगतो की झोपडपट्टी म्हणजे गुन्हेगारांचे नव्हे, तर संघर्ष करणाऱ्या मेहनती लोकांचे जग आहे. त्याचे शब्द सर्वांच्या मनाला भिडतात. प्रेमानंदही सांगतो की माणूस संस्कारांपेक्षा परिस्थितीने घडतो.

शेवटी मतदानात मिलिंद आणि प्रेमानंद सुशीलाच्या निर्दोषतेच्या बाजूने उभे राहतात. नाटकाचा शेवट प्रश्न निर्माण करतो - खरा गुन्हेगार कोण? 'फैसला' नाटक माणुसकी, समानता आणि सामाजिक न्याय यांचे भान देणारा प्रभावी संदेश देते.





सुशीला हे हृदयस्पर्शी पात्र अस्मिता सावंत हिने केले आहे. आनंद जाधव यांनी आपल्या स्वगताने सगळ्यांची मने जिंकली. विजय देवरे यांचे काम या नाटकात सूत्रधाराचे होते. त्यांची भूमिका विशेष उल्लेखनीय वाटली. दीपिका खोडके- खैरनार हिने नकारात्मक पात्र उत्तम पेलले.अमोद वैद्य यांनी फिल्म नटाची उत्तम भूमिका केली. अर्चना सगरे यांनी शिक्षिकेची काम चांगले केले. वकिलाची भूमिका बाळकृष्ण कोठेकर यांनी तर पोस्टमनची व जजची भूमिका एकनाथ चौधरी यांनी केली. राजेश सकपाळ यांनी शिपाईचे काम, सुबोध जाधव यांनी वेटरचे काम, गणेश वाघमारे आणि सुवर्णा जाधव यांनी नाटकात छोटीसी भूमिका केली.

या नाटकाचे लेखन, संगीत व नेपथ्य डॉ. प्रेम जाधव यांनी केले. विशेष म्हणजे लिखाणाचा दर्जा जाणवला. संवाद प्रभावी व टाळ्या घेणारे होते. प्रा. विनायक आभाळे यांनी दिग्दर्शन ही उत्तम केले आहे.संगीत संयोजन अक्षता दातखीळ व विवेक आभाळे यांनी सांभाळलेले आहे. प्रकाश योजना कपिल नाईक यांची असून नाटक प्रकाशमय आणण्यात यशस्वी झाले आहे. वेशभूषा सुवर्णा जाधव, रंगभूषा अक्षता दातखीळ यांनी छान केली आहे. एकंदरीत 'फैसला ' चा एक सुंदर प्रयोग प्रेक्षकांना अनुभवता आला.

# स्वामी रामनंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ती संग्रामात अमुल्य योगदान : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणाईमध्ये देशभक्ती जागृत केली. तसेच महिला व अनेक स्वातंत्र्यसैनिकांना सोबत घेऊन निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाड्याला मुक्त केले. त्यांचे हे योगदान अमुल्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



क्रांती चौक येथील स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे, तसेच ऑनलाईन पद्धतीने ऐतिहासिक कमल तलावाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह मराठवाडा मुक्ती संग्रामात योगदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे कुटुंबिय उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ यांचे संपूर्ण जीवन व्रतस्थ होते. स्वामी विवेकानंदाप्रमाणेच तरूणाईमध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी देशभक्ती जागृत केली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळण्याकरीता जवळपास १३ महिन्यांचा कालावधी लागला. या कालावधीत मराठवाडा निजामाच्या इस्टेटचा भाग होता. रजाकारांच्या संपूर्ण अन्यायाची पराकाष्टा झाली होती, त्याच्याविरुद्ध एक मोठा रणसंग्राम उभा झाला होता. स्वामी रामानंद तीर्थ यांनी या लढ्यात नेतृत्व करुन

### स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे व कमल तलावाचे मुख्यमंत्र्याच्या हस्ते लोकार्पण

हैदराबाद, मराठवाड्यात स्वतंत्र अस्मितेची ज्योत पेटवली. त्यातून अनेक तरुण, महिला या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये सहभागी झाले. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी या स्वतंत्र संग्राम सेनानींच्या हाकेला प्रतिसाद देत सैनिकी कारवाई केली आणि त्यातून मराठवाडा मुक्त झाला. तो दिवस म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ हा होता. दरवर्षी मराठवाडा मुक्ती दिन म्हणून आपण साजरा करतो. या लढ्यात भरीव योगदान दिलेल्या स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करत आहोत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

स्वामी रामनंद तीर्थ यांच्या पुतळ्याचे शिल्पकार निरंजन मडिलगेकर यांचा यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी ऐतिहासिक कमल तलावाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. शहरातील पर्यटन स्थळांमध्ये कमल तलावामुळे भर पडल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. कमल तलावाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्वत: तिकीटाची खरेदी करून कमल तलाव नागरिकांसाठी खुला करण्यात आल्याचे जाहिर केले.

# देश पारतंत्र्यात असताना जैन आचार्य जवाहरलाल महाराजांकडून लोकांमध्ये पुनर्जागृतीचे कार्य : राज्यपाल आचार्य देवव्रत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जैन संत व स्वातंत्र्य सेनानी आचार्य जवाहर लाल महाराज यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांमध्ये धर्म पुनर्जागृतीचे कार्य करीत असताना स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान दिले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मुद्रा तसेच टपाल तिकीट काढून त्यांच्या कार्याची माहिती भावी पिढ्यांना देण्याचे कार्य स्तुत्य आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.



राज्यपाल श्री. देवव्रत तसेच पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत आचार्य जवाहर लाल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्यावरील टपाल तिकिट व मुद्रेचे (नाण्याचे) प्रकाशन रविवारी (दि. १६) राजभवन मुंबई येथे करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल आचार्य देवव्रत बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन जसकरण बोथरा फाऊंडेशनतर्फे करण्यात आले.

भगवान महावीर तसेच विविध जैन संतांनी त्याग, तपस्या व परोपकाराच्या माध्यमातून समाजासाठी प्रेरणादायक काम केले. त्यांनी सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह हे सिद्धांत मानवतेला दिले. जो काळाच्या कसोटीवर टिकतो तो सच्चा धर्म व जो टिकत नाही तो अधर्म असतो असे राज्यपालांनी सांगितले.

आचार्य जवाहर लाल यांनी देश पारतंत्र्यात असताना दहा हजाराहून अधिक सत्संगाच्या माध्यमातून जनजागरणाचे कार्य केले. त्यांनी लोकांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रेरित केले. आचार्य जवाहर लाल यांनी अनेकांत वाद व अपरिग्रह ही तत्वे आयुष्यभर पाळली असे पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया यावेळी म्हणाले.

आचार्य जवाहर लाल महाराज यांनी बालविवाह, हुंडा प्रथा, व्यसनाधीनता यांना तीव्र विरोध केला याचे स्मरण देताना त्यांच्यावरील नाणे व टपाल तिकीट लोकांना त्यांच्या कार्याचे चिरंतन स्मरण देतील, असे श्री. कटारिया यांनी सांगितले. यावेळी जसकरण फाउंडेशनचे विश्वस्त सिद्धांत बोथरा यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह, जसकरण बोथरा फाउंडेशनचे विश्वस्त सिद्धार्थ बोथरा व इतर मान्यवर उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या १,००,१११ व्या साखर पोत्याचे पूजन

## कारखान्यास विविध राज्यातील प्रशिक्षणार्थी १२ आय.ए.एस. अधिकाऱ्यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये उत्पादित झालेल्या १,००,१११ व्या साखर पोत्याचे पूजन कारखान्याचे चेअरमन मा.आ.श्री.प्रशांतराव परिचारक (मालक), यांचे शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन मा.श्री.कैलासराव खुळे, संचालक, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी साहेब व विविध राज्यातील प्रशिक्षणार्थी १२ आय.ए.एस. अधिकारी उपस्थित होते.

विविध राज्यातील आय.ए.एस. परिक्षा पास झालेले प्रशिक्षणार्थी १२ अधिकारी साखर कारखानदारीमधील माहिती घेण्यासाठी कारखान्यावरती आले असता त्यांना कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी साहेब यांनी सहकारी साखर कारखानदारीमधील इतंभुत माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने साखर कारखाना, को-जन प्रकल्प, आसवानी प्रकल्प, इतर पुरक उद्योग यांची सध्याची परिस्थिती, सध्याच्या अडीअडचणी, अंतरराष्ट्रीय साखरेचे दर, शेतकऱ्यांना द्यावा लागणारा ऊस दर, प्रोडक्शन खर्च याबाबींचा समावेश होता. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी साहेब यांनी सहकारी साखर कारखान्याच्या दिलेल्या माहितीबाबत प्रशिक्षणार्थी आय.ए.एस. अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. तसेच त्यांनी कारखान्याच्या गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये उत्पादित झालेल्या १,००,१११ व्या साखर पोत्याचे पुजन प्रसंगी उपस्थिती दर्शवली. प्रशिक्षणार्थी आय.ए.एस. अधिकारी यांनी कारखान्यास भेट दिली असता त्यांचा कारखान्याचे चेअरमन मा आ श्री प्रशांतराव परिचारक मालक यांनी यथोचित सन्मान करून स्वागत केले

कारखान्याचे चेअरमन मा.आ. श्री.प्रशांतराव परिचारक (मालक) यांनी साखर पोती पुजन वेळी माहिती दिली की, कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२६ हा सुरळीत सुरु झाला आहे. कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना हा नेहमीच सभासद शेतकऱ्यांचे, कामगारांचे हित जोपासत आला आहे. गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास येणाऱ्या ऊसास चांगला दर दिला जाणार असून प्रतीदिन १०,००० मे.टनापर्यंत ऊस गाळप करणार आहोत. त्यामुळे ऊस उत्पादकांना चालू हंगामात ऊस तोडणी वेळेवर मिळणार आहे. या हंगामात कारखान्याचे १२ लाख मे.टन ऊस गाळपाचे उदीष्ट असून ते पुर्ण करणार आहोत.

त्यावेळी बोलताना कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी साहेब यांनी माहिती दिली की, कारखाना पहिल्या दिवसापासून विना अडथळा सुरु झाला आहे. गाळप क्षमतेच्या प्रमाणात ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणेची उभारणी केली आहे. कारखान्याच्या गाळप क्षमतेत वाढ झालेने १२ दिवसात कारखान्याने १,१५,४८४ मे.टन इतके गाळप केले असून १,००,१११ पोती उत्पादन झाले असून सरासरी साखर उतारा ९.३२ टक्के मिळालेला आहे. आसवानी प्रकल्पामधून ८,६४,२८२ लि. उत्पादन झालेले असून को-जन प्रकल्पामधून ८२.५२ लाख युनिट विज निर्मीती झाली असून ४६.७० लाख युनिट वीज एक्स्पोर्ट केली आहे.

यावेळी कारखान्याचे संचालक श्री.दिनकरराव मोरे, श्री.उमेशराव परिचारक, श्री.दिलीपराव चव्हाण, श्री.ज्ञानदेव ढोबळे, श्री. तानाजी वाघमोडे, श्री.भगवान चौगुले, श्री.लक्ष्मण धनवडे, श्री.भास्कर कसगावडे, श्री.भैरू वाघमारे, श्री.गंगाराम विभुते, श्री.हणमंत कदम श्री.सुदाम मोरे



श्री.विजय जाधव, श्री.किसन सरवदे, श्री.शामराव साळुंखे, श्री.राणू पाटील, तज्ञ संचालक श्री.दाजी पाटील, श्री.दिलीप गुरव कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ.यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक

# एमएस-सीआयटीचा २५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्राचा एमएस-सीआयटी २५ वा वर्धापन दिन आज माऊली कॉम्प्युटर सेंटर्स च्या वतीने जेवळी येथे मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील या अग्रगण्य अभ्यासक्रमाच्या यशस्वी प्रवासाचा आढावा घेण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी बसवेश्वर हायस्कूल चे मुख्याध्यापक महादेव भोसले, प्रमुख पाहुणे म्हणून जेवळीचे सरपंचा महानंदा मोहन पणुरे, पर्यवेक्षक रामकृष्ण पाटील, आष्टा कासारचे सरपंचा सुलभा कांबळे, दक्षिण जेवळीचे सरपंच शिवराज चिनगुंडे, विस्तार अधिकारी तानाजी महाजन, डॉ. ढोबळे, डॉ. मोघे, डॉ. मोरे, पत्रकार बसवराज होनाजे, मोहन गुरव, पोलिस पाटील धनराज हावळे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय गाडेकर, माजी सैनिक भुजबळ, होनाजे सर, माऊली कॉम्प्युटर चे संचालक धनराज आळंगे, संचालिका धनश्री आळंगे आदीची उपस्थिती होती.





**तंत्रज्ञान युगासाठी नवीन पिढी घडवण्याचा संकल्प**

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.तसेच मागील वर्षात MS-CIT परीक्षेत अव्वल आलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात भोसले, पाटील गुरुजी यांनी MS-CIT ने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात डिजिटल साक्षरता पोहोचवून ज्ञानयुगात मोठे योगदान दिल्याबद्दल कौतुक केले. ते म्हणाले, रोजगार आणि उद्योगाच्या संधींसाठी माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान किती महत्त्वाचे आहे, हे MS-CIT ने सिद्ध केले आहे.

यावेळी संस्थेच्या संचालक आळंगे यांनी पुढील वर्षासाठीच्या अभ्यासक्रमात करण्यात आलेल्या नवीन बदलांची आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण केंद्रांचा विस्तार करण्याच्या योजनांची माहिती दिली.

MKCL संस्थेने नेहमीच काळाशी सुसंगत राहून MS-CIT अभ्यासक्रमात सुधारणा केल्या आहेत, नविन CCTP Typing Course आणि KliC कोर्स २००हून अधिक कोर्स या सेंटरमध्ये शिकवले जातात ज्यामुळे विद्यार्थी आजच्या कॉर्पोरेट जगासाठी तयार होत आहेत.

या वर्धापन दिनानिमित्त MS-CIT ने महाराष्ट्रातील तरुणांना अधिक सक्षम आणि डिजिटल बनवण्याचा आपला संकल्प पुन्हा एकदा दृढ केला. असे मान्यवरांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्ते आणि बचत गटामार्फत चवले मॅडम, व्यंकट बिराजदार, इतर मान्यवर व जेवळी व परिसरातील विद्यार्थी उपस्थित होते.

# सहकार शिरोमणीचे आधारस्तंभ: ज्येष्ठ संचालक ज्ञानेश्वर नारायण फाटे यांचे निधन; सहकार क्षेत्राची मोठी हानी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक कै. वसंतराव दादा काळे यांचे विश्वासू सहकारी आणि कारखान्याच्या सुरुवातीपासूनचे ज्येष्ठ संचालक, तसेच गादेगाव ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच ज्ञानेश्वर नारायण फाटे (आप्पा) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने पंढरपूर तालुक्यात आणि सहकार क्षेत्रात एक निष्ठावान नेतृत्वाचा आधारस्तंभ हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश एकनाथ फाटे यांचे ते चुलते होते.

ज्ञानेश्वर आप्पा फाटे हे वसंतराव दादा काळे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी होते. त्यांनी कारखान्याच्या स्थापनेसाठी केलेल्या अथक प्रयत्नांमध्ये आप्पांचा सक्रिय सहभाग होता. त्यांनी सदैव औदुंबर अण्णा पाटील गट आणि विठ्ठल परिवारासोबत एकनिष्ठ राहून सहकाराच्या चळवळीला बळ दिले. फाटे आप्पा यांनी केवळ सहकारातच नव्हे, तर स्थानिक राजकारणातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी गादेगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच म्हणून काम केले. त्यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे, कारखान्यात नोकरीच्या माध्यमातून गादेगावमधील अनेक बेरोजगार नवतरुणांना रोजगार मिळवून देण्याचे होते.

स्वर्गीय रामभाऊ बागल यांच्यानंतर, सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवून गरजूंना मदत करणारा आणि नोकरी देणारा गादेगावमधील एकमेव नेता म्हणून त्यांची ओळख होती.

सक्षम आर्थिक परिस्थितीतही संयम राखणारे आणि अडचणीच्या काळातही त्याच धैर्याने परिस्थितीला सामोरे जाणारे, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. नेतृत्वाशी त्यांची निष्ठा आणि सामान्यांसाठी असलेला कळवळा हा त्यांच्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग होता. देह रूपाने ते आपल्यातून गेले असले तरी, त्यांनी केलेले सार्वजनिक कार्य आणि सहकारातील योगदान नेहमीच स्मरणात राहील.

# नगरपरिषद उमेदवारांचे अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**







अक्कलकोट/प्रतिनिधी : आज अक्कलकोट, मैंदर्गी आणि दुधनी नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टी, महायुती पक्षाकडून अधिकृत नगराध्यक्ष व नगरसेवक उमेदवारांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार श्री. देवेंद्र दादा कोठे, श्री.शहाजी बापू पवार, श्री. अमोलराजे भोसले, श्री. महेश इंगळे, श्री. मिलन कल्याणशेट्टी, सौ. अंजलीताई बाजारमठ, श्री. अतुल मेळकुंदे यांच्यासह अनेक मान्यवर व अक्कलकोट तालुक्यातील भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

अक्कलकोट, मैंदर्गी आणि दुधनी या तिन्ही शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रशासनात पारदर्शकता राखण्यासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधा प्राधान्याने पुरवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रस्ते-विकास, नव्या संधींना वाव देणारी पायाभूत सुविधा आणि महिला व युवक सक्षमीकरण यांसारखे अनेक मुद्दे आपल्या भारतीय जनता पक्षाच्या कार्यसूचीतील महत्त्वाचे घटक असतील, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले आहे

# नळदुर्ग नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी ८ तर नगरसेवक पदासाठी १८९ उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस. के. गायकवाड) : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे दिवशी म्हणजे दिनांक १७ नोव्हेंबर २२५ रोजी नगराध्यक्ष पदासाठी एकूण ८ अर्ज तर नगरसेवक पदासाठी विविध प्रभागातून एकूण १८९ उमेदवारी अर्ज दाखल झाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.





या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक १० नोव्हेंबर २२५पासून नामनिर्देशन अर्ज भरण्याला सुरुवात झाली असता दि.१३ नोव्हेंबर रोजी फक्त १ उमेदवारी अर्ज दाखल झाला होता तर दि.१४ नोव्हेंबर रोजी ५ उमेदवारानी नगर सेवक पदासाठी उमेदवारी दाखल केले होते. तसेच दि १५ नोव्हेंबर रोजी बेगवेगळ्या प्रभागतुन एकून ११ उमेदवारानी नगरसेवक पदासाठी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले होते. दिनांक १६ व १७ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला वेग येऊन शेवटी अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे दिवशी म्हणजेच दिनांक १७ नोव्हेंबर रोजी एकूण नगरसेवक पदासाठी १८९ अर्ज दाखल झाले असून नगराध्यक्ष पदासाठी एकूण आठ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत त्यामध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अशोक जगदाळे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गतचे संजय बताले, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मेहबूब शेख, एमआयएमचे शहबास काझी भाजपाचे अप्पासाहेब धरणे व इतर असे मिळून आठ उमेदवारांनी नगराध्यक्ष पदासाठी आपले नाम निर्देशन दाखल केले आहे.असे असले तरी अर्ज काढून घेण्याच्या शेवटच्या तारखे नंतर खऱ्या अर्थाने या निवडणुकीतील चित्र स्पष्ट होईल.

**'जेव्हा ती बोलू लागते' काव्यसंग्रहाचे प्रकाशन**

**आंबेडकरी साहित्यविश्वात नवीन पर्वाची नोंद**

# सुरेखा पैठणे यांच्या कविता म्हणजे दु:खावर, संघर्षावर मात करून विजयाची पताका फडकवणारी कविता : प्रा. आशालता कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : आंबेडकरी चळवळीत कार्यरत असलेल्या कवयित्री सुरेखा पैठणे यांच्या 'जेव्हा ती बोलू लागते' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन कल्याण येथील आचार्य कॉन्फरन्स हॉलमध्ये संपन्न झाले. या कार्यक्रमात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत काव्यसंग्रहाचे औपचारिक अनावरण करण्यात आले.

प्रकाशन सोहळा प्रा.आशालता कांबळे, डॉ. श्यामल गरुड, प्रा. डॉ. सुदाम राठोड, डॉ. विठ्ठल शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या नंदा कांबळे आणि सहाय्यक आयुक्त शैलेश दोंदे यांच्या हस्ते पार पडला. हा काव्यसंग्रह ९० पानांचा असून, सामाजिक वास्तव, स्त्रीअनुभव, संघर्ष आणि आत्मविश्वास या विषयांवरील विविध कविता यात समाविष्ट आहेत. पैठणे यांचा हा पहिला काव्यसंग्रह आहे. कवयित्री सुरेखा पैठणे यांनी आपल्या लेखन प्रवासाबद्दल आणि या काव्यसंग्रहाच्या निर्मिती मागील प्रेरणेबद्दल मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात मिलिंद जाधव, अक्षय भोईर , वैभवी अडसुळे यांनी काव्य संग्रहातील निवडक कवितांचे वाचन करून उपस्थितांची दाद मिळवली. या प्रकाशन सोहळ्यास प्रा. सिद्धार्थ मोरे, बबन सरवदे, छाया कोरेगावकर, सिंधुताई रामटेके, उत्तम जोगदंड, शिवा इंगोले, राज असोरोंडकर, सुधीर चित्ते, शिवाजी रगडे यांसह अनेक साहित्यप्रेमी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री सोनाली जाधव यांनी केले, तर आभारप्रदर्शन स्वतः सुरेखा पैठणे यांनी केले. काव्यसंग्रहाच्या प्रकाशनानंतर साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातून सुरेखा पैठणे यांच्या अभिनव काव्यनिर्मितीचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

> **आंबेडकरी स्त्रीने अनेक संघर्षांचा सामना करत स्वतःचा मार्ग तयार केला आहे. 'जेव्हा ती बोलू लागते' मधील कविता येणाऱ्या चौथ्या आंबेडकरी पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रभावी रचना आहेत.**
> **-डॉ. श्यामल गरुड**

> **जो प्रवाह भारतीय संविधानातील मूल्य टिकवून ठेवतो, तोच खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाह आहे. या काव्यसंग्रहातील कविता दुःख आणि संघर्षातून उभारी देणाऱ्या आहेत आणि म्हणूनच त्या मनाला भिडतात.**
> **-प्रा. आशालता कांबळे**



# प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे प्रतिपादन; राजभवन येथे चर्चासत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रासायनिक खताच्या अतिवापरामुळे जमिनीची उत्पादक क्षमता बाधित होत असून त्यासोबतच कॅन्सर, मधुमेह, उच्च रक्तदाब अशा विविध आजारांचे प्रमाण अनेक पटींनी वाढत आहे. हे सर्व रोखण्यासाठी नैसर्गिक शेतीलाच प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासकीय अधिकारी व प्रबुद्ध समाजाने आपल्या स्तरावर नैसर्गिक शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून द्यावे, असे आवाहन महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.



'संकल्प फाउंडेशन' या प्रशासकीय अधिकारी घडवणाऱ्या सेवाभावी संस्थेतर्फे प्रशासकीय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित लोकांसाठी 'नैसर्गिक कृषी : अनुपम भारतीय वारसा' या विषयावर राजभवन मुंबई येथे आयोजित चर्चासत्रामध्ये संवाद साधताना राज्यपाल बोलत होते.

मोठ्या प्रमाणात होत असलेली रासायनिक खतांची आवक थांबवली पाहिजे या खतांमुळे गहू व तांदूळ यातील पोषणमूल्य कमी झाले आहे. भावी पिढ्यांची अन्नधान्य व जलसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी नैसर्गिक शेती आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

नैसर्गिक व जैविक शेतीमध्ये मोठा फरक आहे असे सांगून रासायनिक तसेच जैविक शेती पेक्षा नैसर्गिक शेती मानव तसेच सूक्ष्म जीव कल्याणाची आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

धर्म, अर्थ व काम यांच्या माध्यमातून मोक्षप्राप्तीसाठी निरामय आरोग्य आवश्यक आहे व आरोग्यासाठी दिनचर्या, भोजन यांसह पर्यावरण महत्त्वाचे आहे, असे राज्यपालांनी सांगितले. आज जागतिक तापमानवाढीचे जगापुढे मोठे संकट आहे. त्याचा थेट परिणाम शेतीवर पडत आहे. त्यामुळे सर्वांनी नैसर्गिक शेतीला चालना द्यावी व नैसर्गिक उत्पादने खरेदी करावी, असे आवाहन राज्यपालांनी केले.

संकल्प फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष कुमार तनेजा यांनी आपल्या प्रास्ताविकात संकल्प फाउंडेशनने आजवर हजारो प्रशासकीय अधिकारी घडवले असून ते भारतीय सांस्कृतिक विचार पुढे नेत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे मुंबई येथील संघचालक सुरेश भगेरिया, संकल्पचे महासचिव संतोष पाठक, सचिव राजू चौहान तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते.

# मुलींनी फेसबुक, इंस्टाग्राम पासून दूर राहणे चांगले : सपोनि. पाडवी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय राजकुमार पाडवी सहाय्यक पोलिस निरीक्षक,नागरी हक्क संरक्षक नाशिक यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले या प्रसंगी पाडवी यांनी आपत्कालीन परिस्थितीत पोलिस यंत्रणेस संपर्क कसा करावा, सायबर गुन्हेगारी पासून बचाव कसा करावा, मुलींनी फेस बुक, इंस्टाग्राम पासून दूर राहिलेले बरे

### उगाव विद्यालयात स.पो.नि. पाडवी यांचे व्याख्यान संपन्न

यू ट्यूब चा वापर फक्त शैक्षणिक कामासाठीच करावा या विषय मौलिक व्याख्यान दिले तसेच विद्यालयातील विभागपातळीवर तिहेरी उडी मध्ये तृतीय क्रं. मिळविलेल्या कु. कस्तुरी गायकवाड हिचा सत्कार करण्यात आला.

या वेळी विद्यालयाच्या वतीने प्राचार्य कैलास गवळी यांनी राजकुमार पाडवी यांचा सत्कार केला तर प्रदीप कदम पोलिस हवालदार यांचा सत्कार कोतवाल यांनी केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भालचंद्र सूर्यवंशी यांनी केले तर आभार बापू आव्हाड यांनी मानले.

# येणारा काळ आयुर्वेदाचा सुवर्णकाळ : मुख्यमंत्री फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर (जिमाका) : आयुर्वेद या निसर्गाशी अनुरुप उपचार पद्धतीचे महत्त्व जगभरात मान्य झाले आहे. आयुष मंत्रालयाने या उपचार पद्धतीला शिक्षण, उपचारात वापर, संशोधन अशा विविध प्रकारे चालना दिली असून येणारा काळ हा आयुर्वेदाचा सुवर्णकाळ असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

### श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नूतन वास्तूचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

येथील सातार तांडा भागातील श्रीयश आयुर्वेदिक कॉलेज ण्ड हॉस्पिटल रिसर्च सेंटरच्या नवीन वास्तूचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड, श्रीयश प्रतिष्ठानचे बसवराज मंगरुळे, सचिव संगिता मंगरुळे, रुग्णालय अधीक्षक डॉ. परेश देशमुख, अधिष्ठाता स्वाती इटगे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, भारतीय जीवनपद्धतीस अनुकूल व निसर्गाशी साधर्म्य सांगणारी ही उपचार पद्धती वेदांमध्ये आयुर्वेद या नावाने सांगण्यात आली आहे. आजाराच्या लक्षणांवर नव्हे तर मुळाशी जाऊन आयुर्वेदात उपचार केले जातात. ही उपचार पद्धती शाश्वत उपचार पद्धती आहे. आयुर्वेद उपचार पद्धतीचा जगभरात वापर वाढत आहे. भारतात आयुर्वेद उपचार पद्धतीने उपचार घेण्यासाठी अनेक लोक येत आहेत. आयुर्वेदाने या जगाला विज्ञाननिष्ठ उपचार पद्धती देऊन शल्यचिकित्सा पद्धतीही दिली आहे.

कोविड काळामध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या पूरक औषधांमध्ये आयुर्वेदीक औषधींचा सर्वाधिक समावेश होता. केंद्र सरकारमार्फत या उपचार पद्धतीला प्रोत्साहन दिले जात आहे. प्रशिक्षित वैद्य तयार करण्यासाठी आयुर्वेद महाविद्यालयांना चालना दिली जात आहे.

आगामी दशकात भारत हा जगातली प्रमुख अर्थव्यवस्था बनून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेऊ पाहत आहे. २०४७ पर्यंत आपला देश आर्थिक महासत्ता झालेला असेल. मराठवाड्यातही आपण उद्योग क्षेत्राला पाठबळ देत असून इलेक्ट्रिक व्हेईकलची कॅपिटल म्हणून छत्रपती संभाजीनगरची ओळख निर्माण होत आहे, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

# एसटीच्या उत्पन्नवाढीसाठी 'पंचसूत्री' : परिवहनमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी सर्वसमावेशक 'पंचसूत्री आराखडा' तयार केला आहे. आगार पातळीपासून प्रादेशिक कार्यालयापर्यंत अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी अधिक स्पष्ट करत, सुधारणा, 'वेग' आणि 'नियमितता' या आधारे एसटी महामंडळाला पुढे नेण्याचा निर्धार केल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.



मुंबई येथे एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह सर्व खाते प्रमुख, प्रादेशिक व्यवस्थापक व विभाग नियंत्रक उपस्थित होते.

दैनंदिन बैठकांनी प्रशासन सज्ज

एसटी स्वतःला 'चल संस्था' म्हणून परिभाषित करते. दररोज लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या या व्यवस्थेचे मूल्यमापन आणि नियोजन दैनंदिन पातळीवर व्हावे, यासाठी सकाळी १० वाजता आगारात, ११ ला विभागात आणि १२ वाजता प्रादेशिक स्तरावर आढावा बैठक अनिवार्य करण्यात आली आहे.

प्रवासी तक्रारी, रद्द फेऱ्या, नादुरुस्त वाहने, गैरहजर कर्मचारी, या सर्वांची काटेकोर छाननी करून कार्यपद्धतीत तात्काळ सुधारणा करण्याचा आदेश बैठकीत दिला.

संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत आगार, विभाग व प्रदेशस्तरावर दुसऱ्या दिवशीच्या वाहतूक आराखड्याचे नियोजन केले जाईल. यात्रांपासून बाजारपेठांपर्यंत आणि शालेय सहलींपासून आकस्मिक गर्दीपर्यंत सर्व परिस्थितीसाठी आगार सज्ज राहणार आहे.

चालक-वाहकांसाठी स्पष्ट उद्दिष्टे - कार्यक्षमतेवर भर

डिझेल हा एसटीच्या खर्चातील सर्वांत मोठा घटक. त्यामुळे घझढ (किलोमीटर प्रति १० लीटर) नुसार चालकांना दररोजचे लक्ष्य दिले जाईल. घझढ कमी असणाऱ्यांना समुपदेशन, प्रशिक्षण आणि गरजेनुसार प्रादेशिक स्तरावर उन्नत प्रशिक्षण देण्याचे नियोजन आखले गेले आहे.

तिकीट विक्री ही महसुलाची जीवन वाहिनी असल्याने वाहकांना आगाराच्या दैनंदिन उझघच् (संचित प्रति किलोमीटर उत्पन्न) प्रमाणे उत्पन्नाचे स्पष्ट उद्दिष्ट देण्यात येणार आहे. उत्पन्न कमी असल्यास समुपदेशन, कर्तव्यात बदल किंवा तोंडी/लेखी समज सर्व पर्याय वापरले जातील. सातत्याने कमी उत्पन्न करणाऱ्या वाहकांवर विशेष लक्ष दिले जाईल.

वेळापत्रक व्यवस्थापनात सुधारणांचे वारे

एसटीचे वेळापत्रक हा त्याच्या वाहतूक यंत्रणेचा 'आत्मा' मानला जातो. लांब पल्ल्याच्या समांतर धावणाऱ्या बसेसवरील तक्रारींची दखल घेत आता सर्व वेळापत्रकांची शास्त्रशुद्ध पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जात आहे. मध्यवर्ती कार्यालयाची मंजुरी असलेल्या फेऱ्याच राबवाव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत.

१ जानेवारीला बसस्थानकनिहाय नवे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात येणार असून त्याची व्यापक प्रसिद्धी सोशल मीडियाद्वारे केली जाईल. वक्तशीरपणा आणि नियमितता ही एसटीची नवी ओळख बनवण्याचा संकल्प यातून स्पष्ट दिसतो.

लांब व मध्यम लांब पल्ल्याच्या बसेसना नवे मानदंड

आरक्षणास उपलब्ध बसची संख्या वाढवणे, भारमान ८० टक्के पेक्षा कमी न ठेवणे, चांगले भारमान असणाऱ्या दिवशी जादा फेऱ्यांची उपलब्धता, आणि प्रत्येक फेरीची देखरेखपर्यवेक्षकांच्या 'दत्तक' तत्त्वावर बस फेऱ्या देणे अशा अनेक सुधारणा लांब-मध्यम पल्ल्याच्या व्यवस्थापनात होत आहेत. यासोबतच ऑनलाइन व मोबाईल ॲपद्वारे आरक्षणाला मोठे प्रोत्साहन देण्याचा मानस आहे.

'प्रवासी देवो भव' - सुविधांचा दर्जा उंचावणार

स्वच्छ, टापटीप बसस्थानके, प्रसाधनगृहांची दररोज किमान तीन वेळा तपासणी, उशिरा सुटणाऱ्या किंवा रद्द बस फेऱ्यांची प्रवाशांना योग्य माहिती, पर्यायी व्यवस्था आणि अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रसिद्धी अशा प्रवासी सुविधांना केंद्रस्थानी ठेवणारी उपाययोजना राबवली जाणार आहे.

तक्रारींची तातडीने दखल, नोंद आणि निराकरण यावर आगार व्यवस्थापकांना विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

एसटीच्या आर्थिक पुनरुत्थानाच्या दिशेने ही पंचसूत्री केवळ मार्गदर्शक तत्त्वे नाहीत, तर संपूर्ण व्यवस्थेला बदलण्याचा एक ठोस आराखडा आहे. असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

### हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

# माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचे कार्य राज्याला दिशादर्शक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर (विमाका) :- महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले दिवंगत वसंतराव नाईक यांनी राज्याच्या दुष्काळमुक्तीसाठी केलेली जलसंधारणाची कामे तसेच अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्णतेसाठी राबविलेल्या उपक्रमांचा आजही राज्याला मोठा लाभ होत आहे. राज्याला दिशा देणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको येथे हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, मनपा आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा राज्याच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. राजकारणात विविध पदावर काम करताना महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्याचे देखील काम केले. बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण केली. समाजाला शिक्षणाकडे वळविण्यासाठी अनेक शिक्षण संस्थांची निर्मिती केली असून समाजातल्या विविध परंपरा जोपासल्या पाहिजेत यासाठीही त्यांनी प्रयत्न केला, राजकीय सामाजिक जीवनामध्ये नगराध्यक्ष पदापासून आमदार, खासदार, मुख्यमंत्री अशा विविध पदांवर नाईक साहेबांनी काम केले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वाधिक काळ राहिलेले मुख्यमंत्री म्हणून दिवंगत नाईक साहेबांच्या नावाची नोंद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.




राज्यातील १९७२ च्या भीषण दुष्काळात राज्याला जलसंधारणातून दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय दिवंगत वसंतराव नाईक यांनी घेतला.महाराष्ट्र दुष्काळमुक्त करायचा असेल तर जलसंधारण हाच एकमेव मार्ग आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब साठवा, जमिनीतील पाणी वाढवा, वाहून जाणारी माती रोखा तरच शेतकरी बांधवांना दिलासा मिळेल, असा विचार त्यांनी रूजविला. दिवंगत वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात व्यापक स्वरूपात जलसंधारणाची कामे सुरू करून जलक्रांतीची पायाभरणी केली. महाराष्ट्र अन्नधान्यांच्या बाबतीत समृद्ध व स्वयंपूर्ण व्हावा, हा त्यांचा स्पष्ट हेतू होता. महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करून मोठे परिवर्तन घडवून आणले आणि ते पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरले. दुष्काळाचा सामना करताना इतिहासाचा मागोवा घेतल्यावर हे प्रकर्षाने जाणवले की, दुष्काळाशी लढण्याचा खरा मार्ग म्हणजे नाईक साहेबांनी दाखविलेला जलसंधारणाचा मार्ग. त्याच प्रेरणेने पुढे जलयुक्त शिवार ही राज्यव्यापी योजना तयार करण्यात आली. या योजनेद्वारे महाराष्ट्रभर जलसंधारणाची मोठ्या प्रमाणावर कामे झाली. योजना तयार करत असताना अनेक व्यक्ती प्रेरणास्थान म्हणून आमच्यासमोर होत्या; परंतू या संपूर्ण उपक्रमामागील मूळ प्रेरणास्थान म्हणजे वसंतराव नाईक साहेबच, हे आपण त्या काळातही स्पष्टपणे नमूद केल्याचा उल्लेखही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केला.

दिवंगत वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात कृषी व जलसंधारणाबरोबरच बंजारा समाजासाठीही मोठ्या प्रमाणात जागृती व विकासाची चळवळ उभी केली. तांड्यावर राहणारा, परंपरेने श्रमप्रधान पण विकासापासून दूर राहिलेला हा समाज एकेकाळी मार्गनिर्मिती, बावड्या बांधकामे आणि पायाभूत कामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारा, समृद्ध इतिहास असलेला समाज आहे. पोहरादेवी येथे सेवालाल महाराजांनी बंजारा समाजासाठी निर्माण केलेली 'काशी' अधिक भव्य, आधुनिक आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारी व्हावी, यासाठी सरकारने ७०० कोटी रुपयांचा समग्र विकास आराखडा राबविला. त्यामुळे पोहरादेवीचा संपूर्ण कायापालट झाला असून आज ते राज्यातील महत्त्वाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक केंद्र बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी प्रथमच बंजारा काशी पोहरादेवीला भेट देत म्युझियमचे उद्घाटन केले. याशिवाय म्युझियममध्ये प्रवेश करताना पहिला पुतळा दिवंगत वसंतराव नाईक साहेबांचा स्थापित करण्यात आला आहे. समाजउन्नती, जागृती आणि परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या नाईक साहेबांच्या कार्याचा हा सन्मान असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून आज दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण होत आहे, हा दिवस खऱ्या अर्थाने बंजारा समाजासह आपल्या सर्वांसाठी दिवाळीप्रमाणेच आहे. महानगर वेगाने वाढत असून महानगर सुंदर झाले पाहिजे, कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक छत्रपती संभाजीनगर येथे येतील, त्यादृष्टीने शहराच्या रस्ते तसेच सर्वांगिण विकासासाठी निधीची तरतूद गरजेची असल्याचे ते म्हणाले. दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुतळा आपल्या सर्वांना प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले. महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.